# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
## विष्णुपूरी, नांदेड–४३१ ६०६

संदर्भ :परीक्षा/कला/२०१०–११./ ५२५७ दिनांक : १२/०३/२०११

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय :— 'सर्टिफिकेट कोर्स इन सॉफ्ट स्किल ॲण्ड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट' या अभ्यासक्रमा बाबत.
संदर्भ :— शैक्षणिक विभागाचे पत्र क्र. शै./सॉफ्ट/२००९.१०/२४२१ दि. ३०.१२.२००९.

महोदय,

संदर्भाकीत परिपत्रकान्वये, शैक्षणिक विभागाकडून सॉफ्ट स्किल ॲण्ड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम अंतर्गत 'सर्टिफिकेट कोर्स इन सॉफ्ट स्किल ॲण्ड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट' हा अभ्यासक्रम मागील वर्षापासून सर्व संलग्नित महाविद्यालयात चालू करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षेसंदर्भात आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येते आहे.

१. ज्या महाविद्यालयांनी 'सॉफ्ट स्किल ॲण्ड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमांना शिक्षकांना पाठविले होते त्याच महाविद्यालयांमध्ये सदर अभ्यासक्रम राबविता येणार असल्याने केवळ अशाच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात येतील.

२. संदर्भाकीत परीपत्रकान्वये कळविल्याप्रमाणे सदर अभ्यासक्रमासाठी ५० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. त्यापैकी लेखी परीक्षा १० गुणांची व मौखिक परीक्षा ४० गुणांची असेल. मौखिक परीक्षेच्या वेळीच बहि:स्थ परीक्षकांकडून १० गुणांची लेखी परीक्षा घेतली जाईल. या परीक्षेसाठी विद्यापीठाकडून कोणतीही प्रश्नपत्रिका पाठविली जाणार नाही.

३. सदर परीक्षा संलग्नित महाविद्यालयातील पदवी परीक्षा झाल्यानंतर घेण्यात येणार आहे.

४. सदर अभ्यासक्रमांसाठी प्रति विद्यार्थी रू.७५/— याप्रमाणे परीक्षा शुल्क आकारून परीक्षार्थीची यादी परीक्षा विभागात विद्याशाखेनिहाय दि. ३१ मार्च २०११ पर्यंत सादर करावी. तसेच आपण सदर प्रमाणपत्र अभ्यासक्रम आपल्या महाविद्यालयात सुरू केलेला असल्यास तसे डॉ. दिलीप चव्हाण, समन्वयक, ' सॉफ्ट स्किल ॲण्ड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम', भाषा व वाड्मय संकुल, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ नांदेड यांना संपूर्ण तपशीलांसह कळवावे.

५. सदर परीक्षेसाठी विद्यापीठाकडून बहि:स्थ परीक्षकांची नियूक्ती केली जाणार आहे. बहिस्थ परीक्षकांचे टि.ए. व डी. ए. व परीक्षेचे मानधन हे विद्यापीठाने प्रात्यक्षिक परीक्षेसाठी तयार केलेल्या नियमावलीनुसार संबंधित महाविद्यालयाने परीक्षा झाल्यानंतर तात्काळ बहि:स्थ परीक्षकांना अदा करावे.

तरी 'सर्टिफिकेट कोर्स इन सॉफ्ट स्किल ॲण्ड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट' हा अभ्यासक्रमाच्या परीक्षे संदर्भात वरील प्रमाणे कार्यवाही करून विद्यापीठास सहकार्य करावे.

परीक्षा नियंत्रक

प्रत — डॉ. दिलीप चव्हाण, समन्वयक, सॉफ्ट स्किल ॲण्ड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट प्रोग्राम, माहिती तथा अ.क्र. ५ बाबत कार्यवाही स्तव.